# माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास

**डॉ. श्रीमती व्ही. व्ही बाविस्कर**

*सहयोगी प्राध्यापक*

*एन.टी.व्ही.एस. शिक्षण शास्त्र महाविद्यालय, नंदुरबार*

***सारांश: प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी संशोधकांनी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीची निवड केलेली होती सदर संशोधनासाठी विद्यार्थ्यांमधील ग्रामीण-शहरी अनुदानित विनाअनुदानित अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आला यासाठी प्रश्नावलीचा वापर केलेला करण्यात आला प्राप्त माहितीच्या आधारावर संख्याशास्त्रीय t मूल्याचा वापर करून परिकल्पना यांची पडताळणी करण्यात आली व यात निष्कर्ष खालीलप्रमाणे आले***

**निष्कर्ष-** माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्ता ही सारखीच आहे यावरून असे म्हणता येईल की अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सामाजिक बुद्धिमत्तेत फरक नसतो दोन्हींची बुद्धिमत्ता ही सारखीच असते.

**प्रस्तावना :**

शिक्षणाचा हेतू माणसाला माणूस म्हणून घडवणं हा आहे. त्याला जीवनासाठी घडवणं, त्याच्या मनाची मशागत करणं हा आहे. शिक्षणाचं उद्दिष्ट आहे असा माणूस घडवणं जो संवेदनशील आहे, जिज्ञासू आहे, ज्याला योग्य प्रश्न पडतात आणि ते विचारण्याचं धाडस त्याच्यामध्ये आहे. असा माणूस की ज्याच्या मध्ये स्वावलंबी होण्याचं ज्ञान, कसब आणि कौशल्य तर आहेच पण आपल्याबरोबर आपल्या परिवाराची, आपल्या समाजाची काळजी करण्याचं सामर्थ्यही त्याच्यात आहे. असा माणूस जो चांगला नागरिक आहे, सामाजिक प्रक्रियांमध्ये जो सहभागी होतो. माणसाला सर्वांगीण प्रगतीच्या वाटेनं नेण्याचं, शहाणं करण्याचं आणि व्यापक विचार करायला लावण्याचं काम शिक्षण करतं. शिक्षण माणसाच्या बौद्धिक, वैचारिक, सामाजिक, अध्यात्मिक, भावनात्मक, सृजनशील क्षमता विकसित करतं. शिक्षण ही अशी गोष्ट आहे जी माणसाला पुढे नेते.

शिक्षण संबंधीच्या प्रचलित कल्पनेमध्ये शाळेत जाणे साक्षर असणे वेगवेगळ्या परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा पदवी मिळवणे किंवा ज्ञान वेधता प्राप्त करणे इत्यादींचा समावेश आपण बऱ्याच वेळेस संकुचित अर्थाने करत असतो खऱ्या अर्थाने मनुष्य जीवनात ज्या वेळेस यशस्वी होतो त्याच वेळेस त्याच्या शिक्षणाचा व जीवनाचा संबंध लावला जातो

शाळेची पायरी न चढलेल्या अजिबात अक्षर ओळख नसलेल्या एक ही पदवी नसलेल्या परंतु आपल्या विद्वत्तेने व कर्तबगारीने जगाचे डोळे दिपवून टाकणाऱ्या माणसांची उदाहरणं या जगात अनेक आहेत कविश्रेष्ठ रवींद्रनाथ टागोर शालेय शिक्षण यशस्वी झाले नाहीत परंतु समाज जीवनात मात्र त्यांनी कीर्ती मिळवली थोडक्यात सांगायचं झालं तर आजचा विद्यार्थ्यांच्या जर आपण विचार केला तर विद्यार्थ्यांकडे आज भरपूर प्रमाणात पुस्तकी ज्ञान असून चालत नाही त्या ज्ञानाला अनुभूतीचा आधार आणि त्याचबरोबर ज्ञान व्यवहारात आणि आचरणात जीवनात उतरलं पाहिजे ही चूक विद्यार्थी करतो

पुस्तकी ज्ञान घेऊन तो बाहेर जगात पडतो परंतु जीवनातून समस्यांना तोंड देण्यासाठी त्याचा आवाका कमी पडतो अनुभव त्याला नसतात समाजजीवनातील चारचौघात कसं बोलावं जीवनात यशस्वी होऊ शकत नाही अशा वेळेस निष्क्रिय ज्ञान कृती आणि चारित्र्य याची सांगड घालता येत नाही. शिक्षणाचा शास्त्रशुद्ध अर्थ लक्षात घेतला तर व्यक्तिमत्त्वाचा

सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण परंतु अनुभवातून पुढे जाण्यासाठी ज्या काही गोष्टी विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित असतात त्याला प्राप्त करता येत नाही

21 व्या शतकातील आधुनिक तंत्रविज्ञानाचा जोरावर आमचा विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रातील आपले वर्चस्व टिकवून ठेवत असला तरी समाजापासून, कुटुंबापासून व मित्र परिवारापासून मात्र दूर जात आहे. पिढीमध्ये समाजाविषयी आपुलकीच शिल्लक नाही असा जनमाणसामधील प्रतिक्रियात्मक प्रतिसाद येत आहे. समाजातील सामाजिकपणकमी होवून व्यक्तिकेंद्री हिताचा तो विचार करताना दिसतो. मग अशावेळी अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जाताना शेवटी सामाजिक भान तरूण विद्याथ्र्यांमध्ये राहत नाही.व्यक्ति तितक्या प्रकृती या नात्याने महाविद्यालयीन विद्याथ्र्यांमधील सामाजिक बुध्दिमत्ती ही कमी असल्यास महाविद्यालयांना सदर संशोधनाचा आधार घेवून विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुध्दिमत्ता लक्षात येईल.

**समस्या विधान** - माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**उद्देश**

1. शहरी व ग्रामीण माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2. सरकारी - गैर-सरकारी माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**गृहीतक**

1. शहरी व ग्रामीण माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुध्दिमत्तेत लक्षणीय फरक नाही.
2. सरकारी - गैर-सरकारी माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुध्दिमत्तेत लक्षणीय फरक नाही.

**पध्दती:** प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास हा मुख्य हेतू आहे. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

**सादर उपकरणे -** या अभ्यासात सामाजिक बुध्दिमत्त प्रश्नावली वापरली गेली आहे.

**न्यादर्श:** सर्व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील जनसंख्या म्हणून निश्चत करण्यात आली होती. या जनसंख्येमधून सहेतूक नमुना निवड पध्दतीने 120 माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची निवड केली होती

**माहितीचे विश्लेषण-** प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन, t-test या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब करण्यात आला होता.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन:-** माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्तेचा या अभ्यासात चाचणीला दिलेल्या प्रतिसादावरून पुढीलप्रमाणे माहितीचे विश्लेषण करण्यात आले व त्यावरून परिकल्पना पुढीलप्रमाणे..

**1. शहरी व ग्रामीण माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्तेत लक्षणीय फरक नाही.**

| विद्यार्थी | मध्यमान | प्रमाणविचलन | प्राप्त 't' मूल्य | नमुना 't' | DF | स्वीकार / त्याग |
|---|---|---|---|---|---|---|
| शहरी | 90.05 | 15.47 | 1.07 | 2.00 | 118 | स्वीकार |
| ग्रामीण | 88.45 | 16.49 | | | | |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन:-** संख्याशास्त्रीय टेबल D वरुन स्वाधिनता मात्रा (df) 118 साठी 0.05 स्तरावर नमुना 't' मूल्य = 2.00 आहे व प्राप्त 't' मुल्य 1.07 आहे. प्रस्तुत संशोधनातील प्राप्त 't' मुल्य 1.07 असुन ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. यावरून

असे म्हणता येईल, शहरी व ग्रामीण माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्तेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. दोन्ही गटातील मध्यमानातील आलेला फरक हा योगायोगाने आलेला असावा असे म्हणावे लागेल.

**निष्कर्ष:** शहरी व ग्रामीण माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्ता ही सारखीच आहे यावरून असे म्हणता येईल की शहरी आणि ग्रामीण माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सामाजिक बुद्धिमत्तेत फरक नसतो दोन्हींची बुद्धिमत्ता ही सारखीच असते.

**2. अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्तेत लक्षणीय फरक नाही.**

| विद्यार्थी | मध्यमान | प्रमाणविचलन | प्राप्त 't' मूल्य | नमुना 't' | DF | स्वीकार / त्याग |
|---|---|---|---|---|---|---|
| अनुदानित | 91.05 | 17.11 | 1.10 | 2.00 | 118 | स्वीकार |
| विनाअनुदानित | 89.45 | 16.89. | | | | |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन:-** संख्याशास्त्रीय टेबल D वरुन स्वाधिनता मात्रा (df) 110 साठी 0.05 स्तरावर नमुना 't' मूल्य = 2.00 आहे व प्राप्त 't' मुल्य 1.10 आहे. प्रस्तुत संशोधनातील प्राप्त 't' मुल्य 1.10 असुन ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. यावरून असे म्हणता येईल, अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्तेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. दोन्ही गटातील मध्यमानातील आलेला फरक हा योगायोगाने आलेला असावा असे म्हणावे लागेल.

**निष्कर्ष:** अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुद्धिमत्ता ही सारखीच आहे यावरून असे म्हणता येईल की अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सामाजिक बुद्धिमत्तेत फरक नसतो दोन्हींची बुद्धिमत्ता ही सारखीच असते.

**संदर्भग्रंथसूची**


1. आगलावे, प्रदिप. (2000). संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे (प्रथम आवृत्ती). नागपूर: विद्या प्रकाशन.
2. बिरजे, सु. (2015). माध्यमिक शाळा संहिता. (प्रथम आवृत्ती), पूणे: चौधरी लॉ पकब्लशर्स.
3. पाटील, अ. (2008). मानसशास्त्रीय चाचण्या (प्रथम आवृत्ती). पुणे: डायमंड पकब्लकेशन्स.
4. पोखरापूरकर, द. खं. (1999). संशोधनासाठी नमुना निवड-पूष्प अकरावे (प्रथम आवृत्ती). नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
5. मुळे, रा. शं., उमाठे, वि.तु. (1987). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे (प्रथम आवृत्ती). नागपुर: महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.